# शिक्षण परिषद

## शैक्षणिक परिवर्तनाची एक चळवळ



### शिक्षण परिषद म्हणजे काय?

प्रत्येक मुला-मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शिक्षकांच्या क्षमताबांधणीचे व्यासपीठ म्हणजे शिक्षणपरिषद.

केंद्रातील सर्व शिक्षक, दरमहा केंद्रप्रमुखांच्या नेतृत्त्वाखाली एकत्र येतात, विविध अध्ययन-अध्यापन पद्धती, नवोपक्रम व प्रत्यक्ष अनुभव यांचे आदान प्रदान करत स्वतःची शैक्षणिक समज व कौशल्ये यांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहतात. त्यासाठी मूल्यमापन आणि संख्यात्मक तसेच गुणात्मक माहिती विश्लेषणाचा आधार घेतात. त्या आधारे शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेतात, गुणवत्ता वाढीसाठी पुढील महिन्याचे नियोजन करतात.

### शिक्षण परिषद उद्देश

**देवाण घेवाण:**
नेहमीची बैठक न होता, एका विशेष उद्देशासाठी एकत्र येण्यासाठी व्यासपीठ, केंद्रांतर्गत शिक्षक, केंद्र प्रमुख आणि इतर संबंधित अधिकारी यांच्यामध्ये आंतरक्रिया घडवून आणण्यासाठीचे प्रभावी माध्यम

**अध्ययन निष्पत्तीवर भर:**
मुल कसे शिकते, मुलांची पातळी कशी ओळखावी, आणि त्यानुसार नियोजन कसे करावे,विविध क्षमतांवर आधारित मूल्यमापन, निरीक्षण नोंदी, मुलांच्या प्रगतीचा दस्तावेज कसा ठेवावा यावर चर्चा आणि नियोजन



**खऱ्या गरजा आणि परिस्थितीनुसार नियोजन:**
आपल्या समस्या आपल्या केंद्रातून सोडवणे, शैक्षणिक वातावरण निर्मिती होण्यास मदत

**शिक्षकांसाठी, शिक्षकांचे व्यासपीठ:**
शिक्षकांमधील नेतृत्व विकास करण्यासाठीचे व्यासपीठ, शिक्षकांना प्रोत्साहन मिळून कार्यप्रवणतेची भावना वाढणे, शिक्षकांमधील आत्मविश्वासात वाढ

## शासन निर्णय

१ सप्टेंबर २०१६ च्या शासनपरिपत्रकानुसार केंद्र संमेलनांच्या धर्तीवर घेतल्या जाणाऱ्या या परिषदांचा मूळ उद्देश हा 'प्रत्येक मूल शाळेत- प्रत्येक मूल प्रगत' हे ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी, केंद्रातील सर्व शिक्षकांनी एकत्रित येऊन शैक्षणिक गुणवत्ता, विविध अध्ययन-अध्यापन पद्धती, एकमेकांचे उपक्रम व अनुभव यांचे आदान प्रदान करणे, तसेच अध्ययन निष्पत्तीमधे मागे पडलेली, सतत गैरहजर, स्थलांतरित व अध्ययन अक्षम असणारी मुले यावर चर्चा करून नियोजनाद्वारे एकत्रीत उपाययोजना आखणे हा आहे. शिक्षकांसाठी बाह्य तज्ञ प्रशिक्षणे आयोजित करून शैक्षणिक समस्यांवर साचेबद्ध उपाय न शोधता त्याऐवजी ज्या स्थानिक शिक्षकांनी प्रत्यक्ष काम करून बदल घडवून आणले आहेत, अशा शिक्षकांना स्वतःचे काम/विचार/नवोपक्रम सादर करण्याची संधी व प्रोत्साहन मिळावे हा आहे.

## शिक्षण परिषदेची प्रक्रिया

### १. सहभागाविषयी विनंती/सूचना

विषयपत्रिकेसह (अजेंडा) दिनांक, ठिकाण व वेळ हे शिक्षण परिषदेच्या किमान तीन दिवस आधी सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवणे.

### २. मागील महिन्याचा आढावा

सुरवातीला मागील महिन्यातील केंद्राची स्थिती, त्या माहितीच्या आधारे विश्लेषण याबाबत चर्चा, मागील महिन्यात निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्ती, उद्दिष्टे यातील प्रगती याचे सादरीकरण, त्यातील उत्तम पद्धती, आव्हाने याबाबत सविस्तर चर्चा होते.

### ३. पुढील महिन्याचे उद्दिष्ट ठरवणे

आढाव्यातील मुद्द्यांचा विचार करून सदर महिन्याचे उद्दिष्ट ठरविण्यात येतात. यासाठी सर्व शिक्षक आणि केंद्र प्रमुख मिळून साधकबाधक चर्चा करतात. मुलांच्या प्रगतीची, अध्ययन स्थितीच्या अद्ययावत माहितीचा या चर्चेला आधार असतो. यात मुख्यत्वे

अ. सर्व शिक्षक कोणत्या घटकांवर काम करणार आहेत आणि

आ. त्यातून कोणत्या अध्ययन निष्पत्ती, क्षमता मुलांना साध्य होणार आहेत याचा विचार होतो.

इ. मुल्यमापन कसे करणार याचा विचार होतो.

### ४. पुढील महिन्याचे नियोजन

उद्दिष्टे निश्चित झाल्यानंतर तीन टप्प्यांमध्ये शिक्षण परिषदेमध्ये शिक्षक चर्चा आणि नियोजन करतात.

अ. मोठ्या गटात चर्चा

- सर्व शिक्षक एकत्रितपणे ठरवलेल्या उद्दिष्टांवर मोकळेपणाने आपले मत मांडतात.
- सर्व इयत्ता / विषयांसाठी मार्गदर्शक ठरू शकतील अशी शिक्षकांची सादरीकरणे, प्रात्यक्षिके यावेळी केली जातात. यानंतर अधिक सखोल चर्चा आणि कामासाठी शिक्षकांचे लहान गट केले जातात.
- लहान गटात चर्चा आणि काम

  केंद्राच्या अध्ययन स्थितीच्या माहितीनुसार, केंद्रातील शिक्षक संख्या इत्यादींनुसार हे गट केले जातात. हे गट विषय निहाय, इयत्ता निहाय किंवा शाळा निहाय असू शकतात. यामध्ये शिक्षक पुढील महिन्याच्या उद्दिष्टांमधील अध्ययन निष्पत्ती, क्षमता एकमेकांकडून, केंद्र प्रमुख, केंद्र संसाधन गटातील शिक्षक यांच्या मदतीने अधिक बारकाईने समजून घेतात.

- निश्चित केलेल्या निष्पत्ती आणि क्षमतांसाठी कोणकोणते उपक्रम घेता येतील, मुलांना त्या क्षमता प्राप्त होत आहेत की नाही हे तपासण्याचे मार्ग, याबाबत आपले विचार, कल्पना याचे एकत्रीकरण करतात.
- उपस्थित शिक्षकांपैकी कोणाकडे प्रभावी संसाधने, उपक्रम असल्यास त्यावर चर्चा होते. आवश्यकता भासल्यास त्याचे संपूर्ण गटासमोर सादरीकरण करायचे नियोजन करता येते,

  लहान गट हे विषय / इयत्ता / शाळा निहाय उद्दिष्टांसाठी अधिक भरीव नियोजन करण्यास उपयुक्त ठरतात. यातील चर्चेनंतर शिक्षक आपले वैयक्तिक नियोजन करण्यास अधिक सक्षम होतात.
- **वैयक्तिक काम**

  ठरलेल्या उद्दिष्टांबाबत स्पष्टता, त्याबाबत नियोजन करण्यासाठी नवनवीन उपक्रम, कल्पना याच्या सहाय्याने आपल्या वर्गातील मुलांसाठी क्षमता आधारित नियोजन करण्यासाठी शिक्षकांना वेळ दिला जातो. यात आपल्या वर्गातील प्रत्येक मुलासाठी शिक्षक नियोजन करतात. त्यातील संभाव्य अडचणी, आव्हाने नोंदवून ठेवतात.

### ५. नियोजनाचे सादरीकरण

शिक्षकांनी तयार केलेल्या नियोजनाचे सर्वांसमोर सादरीकरण करणे हे प्रतिसाद, नवीन कल्पना, सूचना यासाठी मदत करते. केंद्रातील शिक्षक संख्येनुसार केंद्रप्रमुख, नियोजनाच्या सादरीकरणाचे स्वरूप ठरवतात. हे सादरीकरण लहान गटांचे किंवा वैयक्तिक शिक्षकांचे सुद्धा असू शकते. यामध्ये

अ. केंद्राने एकत्रित ठरवलेल्या उद्दिष्टांमधील सर्व किंवा लागू असणाऱ्या उद्दिष्टांसाठी आवश्यक तयारी, उप्रकम

आ. संभाव्य अडचणी, आव्हाने

इ. आवश्यक मदत

इत्यादी बाबींचा समावेश होतो. या सर्व सादरीकरणांचे दस्तऐवजीकरण करण्याची जबाबदारी केंद्र प्रमुख एखाद्या शिक्षकांना सोपवतात. ही जबाबदारी दरमहा नवीन शिक्षकही बजावू शकतात.

### ६. मूल्यमापनाबाबत चर्चा

शिक्षण परिषदेतील चर्चा, नियोजन हे केंद्रातील गरजांसाठी अधिकाधिक संयुक्तिक करायचे असेल तर मुलांच्या अध्ययन स्थितीची माहिती आवश्यक ठरते. या माहितीला मूल्यमापनाचा आधार असतो. मुल्यमापनाचा हेतू हा मुले एका महिन्यात काय शिकली केवळ हे पाहण्याचा नसुन मुलांना कोणते अध्ययन अनुभव देणे योग्य राहील, यासाठी मुलांची सद्यस्थिती तपासणे हा होय. त्यामुळे **क्षमता आधारित मूल्यमापन हे अधिक उपयुक्त मूल्यमापन ठरते.** शिक्षण परिषदेमध्ये निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तींची पुर्तता झाली आहे की नाही हे निव्वळ उपक्रम पूर्ण झाले का यावर न ठरवता मुलांचे वर्ग पातळीवर मूल्यमापन घेऊन किती मुलांना ती क्षमता प्राप्त झाली आहे हे पाहून ठरवले जाते.

### ७. आव्हाने – चर्चा आणि नियोजन

शिक्षण परिषदेच्या आढाव्यात किंवा नियोजनाच्या सादरीकरणात शिक्षकांनी मांडलेली आव्हाने यावर शिक्षण परिषदेत चर्चा होणे, मदतीचे नियोजन करणे अपेक्षित असते. या आव्हानांचा विचार करून केंद्र प्रमुख शिक्षकांच्या, केंद्राच्या गरजा ओळखू शकतात, आवश्यकता असल्यास केंद्रांतर्गत / तालुका-जिल्हा स्तरावर प्रशिक्षणासाठी विनंती करू शकतात.

### ८. समारोप

समारोप करताना शिक्षण परिषदेतील चर्चा, उद्दिष्टे, पुढील महिन्याचे नियोजन याची

थोडक्यात मांडणी केली जाते. तसेच पुढील शिक्षण परिषदेची तारीख ठरवली जाते.

### शिक्षण परिषदेचे फायदे

१. केंद्राच्या शैक्षणिक गरजा, समस्या सोडवण्यासाठी शिक्षकांना हक्काचे व्यासपीठ

२. समस्या निराकरणासाठी आवश्यक संघभावना निर्माण

३. शिक्षकांनी परस्परांकडून शिकणे आणि त्यातून सातत्यपूर्ण सक्षमीकरणास वाव

४. केंद्राच्या गरजा आणि बलस्थाने याबाबत केंद्र प्रमुखांना आणि केंद्रातील सर्व शिक्षकांना स्पष्टता

५. शिक्षक सक्षमीकरणाचा मुल शिकण्याच्या प्रक्रियेशी थेट संबंध

६. केंद्रातील प्रत्येक मुला-मुलींच्या क्षमतांचा विचार

७. प्रत्येक मुला-मुलीच्या सर्व क्षमतांसाठी केंद्रातील सर्व शिक्षकांचे कौशल्य, अनुभव याचा उपयोग

### निरंतर व प्रभावी प्रक्रियेसाठी काय करावे

शिक्षण परिषद ही निरंतर व सार्वत्रिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची परिणामकारकता अनेक गोष्टींवर अवलंबून असली तरी आपण आवर्जून काय करावे, काय टाळावे याबाबत अभ्यासातून काही गोष्टी निदर्शनात आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे:

## काय करावे?

- शिक्षक आणि मूल हे दोन घटक केंद्रस्थानी ठेवून नियोजन करणे.
- शिक्षकांना येणाऱ्या वर्गांतर्गत अडचणींचा शिक्षण परिषदेतील चर्चांमध्ये समावेश असावा.
- केंद्रातील शिक्षण परिषदेमध्ये ३५ ते ४० शिक्षक सहभागी होऊ शकतात. त्यापेक्षा अधिक शिक्षक केंद्रात असतील तर इयत्तेनुसार दोन स्वतंत्र शिक्षण परिषदांचे आयोजन भिन्न दिवशी करावे. त्यामुळे सर्व शिक्षकांना संधी मिळते व मुद्देसूद चर्चा होऊन सर्व विषयांना योग्य न्याय देता येतो.
- शिक्षण परिषदांच्या तारखा व स्थळ यांचे आधीच सर्वांच्या सोयीने नियोजन करून दर मासिक परिषदेमध्ये पुढील तारीख व स्थळ जाहीर करावे.
- विषयपत्रिकेनुसार वेळेचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे प्रक्रियेची गांभीर्यता आणि उपयुक्तता देखील वाढते.

## काय टाळावे?

- स्वागतातील औपचरिकता- हारतुरे, सत्कार
- अनावश्यक व अस्थानी खर्च- शिक्षण परिषद हा एकत्रित शिकण्याचा आनंददायी अनुभव आहे. निमंत्रित, भेटी, भोजन व्यवस्था, नियोजन यांच्यात साधेपणा बाळगणे आवश्यक आहे.
- एकांगी मांडणी - सर्वांना सहभागाची संधी न देणे, पक्षपातीपणा, नेहमी काही ठराविक शिक्षकच सादरीकरण तर करत नाहीत ना, हे तपासून टाळले पाहिजेत.
- विषयांची किंवा उपक्रमांची निवड करताना, केंद्राच्या गरजा, शिक्षकांच्या गरजा, मुलांच्या क्षमता, उपयुक्तता, सुयोग्यता विचारात न घेता ढोबळमानाने निवड करणे.

gyan prakash FOUNDATION

**ग्यानप्रकाश फाउंडेशन**

३०२, 'ऑर्चर्ड' डॉ.पै.मार्ग, बाणेर, पुणे-४५
इमेल-admin@gyanprakash.org